नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २९६ | Issue - 296 | वार बुधवार दि. १८ मार्च २०२६ | Blow- Wednesday Date 18 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यावर अवकाळीचे सावट; धारवाडमध्ये हिमवर्षावस

## वयोवृद्ध म्हणाले असा पाऊस बिघतला नाही; धाराशिवमध्येही मोठ-मोठ्या गारांचा पाऊस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे: राज्यात सध्या उन्हाचा चटका वाढलेला असतानाच आता हवामानात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्याच्या अनेक भागांत पावसाची हजेरी लागणार असून, विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये गारपिटीचा इशाराही देण्यात आला आहे. ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार, १७ ते २० मार्च या कालावधीत कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

राज्य सरकारने महाराष्ट्रातील विदर्भासह काही जिल्ह्यात अवकाळी पा-वसाचा अंदाज वर्तवला होता. त्यानुसार, आज १७ मार्चपासून हा पाऊस पडणार असल्याचं सांगण्यात आलं. कर्नाटकातही अनेक ठिकाणी मंगळवारी अवकाळी पाऊस पडला असून सीमारेषेवरील धारवाड जिल्ह्यात कलघटगी तालुक्यातील पाच्छापूर गावात हिमवर्षाव झाल्याप्रमाणे गारा पडल्या. सगळीकडे बर्फ आच्छादल्यासारखे दृश्य तेथे पाहायला मिळाले, पाच्छापूर गावात अचानक सायंकाळी पावसाला सुरुवात झाली आणि काही वेळातच गारांचा तुफान पाऊस सुरू झाला.

गारांच्या तुफानी वृष्टीने सगळीकडे बर्फ पसरल्यासारखे दिसत होते, ही अनोखी बर्फवृष्टी पाहून गावकरी अचंबित झाले आहेत. गावातील वयस्कर लोकांनी अशा तऱ्हेचा बर्फ वृष्टी सदृश्य गारांचा पाऊस आपण प्रथमच पाहिल्याचे सांगितले. सध्या गावकरी या अनोख्या गारपीटबाबत चर्चा करण्यात गुंतले आहेत. धाराशिव जिल्ह्यातही मुसळधार पाऊस पडला असून गारांचा मोठा वर्षाव झाला, अवकाळी पावसासह गारपिटीचा तडाखा बसल्याने शेती पिकांचे नुकसान झालं आहे. धाराशिवच्या उमरगा आणि लो-हारा परिसरात गारपीट झाल्याने हरभरा, ज्वारी, गहू काढणीला आलेला असताना



गारपिट झाल्याने शेतकऱ्यांचे मोठं नुकसान झालंय. आंबा उत्पादक शेतकऱ्यालाही गारपिटीचा तडाखा बसला, तसेच काढणीसाठी तयार असलेले कांदा,ज्वारी आणि गव्हाच्या पीकाचे मोठे नुकसान झाले आहे. अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे, दरम्यान, पुढील काही दिवस अवकाळीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

सोमवारी विदर्भातील वाशिमम ध्ये राज्यातील सर्वाधिक ४०.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर दुसरीकडे पुण्यात रात्रीचा पारा १६.४ अंशांपर्यंत खाली आल्याने थंडावा जाणवला. मात्र, आता ढगाळ हवामानामुळे रात्रीच्या उकाड्यात वाढ होण्याची शक्यता आहे.

गारपीट: बुधवारी (१८ म ार्च) अमरावती, अकोला, वर्धा, नागपूर, भंडारा आणि गोंदिया या सहा जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी गारपीट होण्याची दाट शक्यता आहे. म राठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, धाराशिव आणि लातूरसह मध्य महाराष्ट्रातील अहिल्यानगर (अहम दनगर), सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज आहे.१८ म ार्चपासून मुंबईसह कोकणात हलक्या सरी कोसळू शकतात. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना वादळी पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या उत्तर कोकण पट्ट्यासह नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर या १३ जिल्ह्यांमध्ये उष्णतेची तीव्रता कायम राहील. रात्रीच्या वेळी दमट हवामानामुळे उकाडा वाढणार असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

राज्यात एकाच वेळी उष्णतेची लाट, अवकाळी पाऊस आणि गारपिटीचे संकट उभे ठाकले आहे. याचा मोठा फटका काढणीला आलेल्या पिकांना आणि फळबागांना बसण्याची भीती आहे. त्याम ुळे शेतकऱ्यांनी पिके सुरक्षित ठिकाणी साठवावीत. तसेच नागरिकांनी बदलत्या हवामानामुळे उद्भवणाऱ्या आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.



## संतापजनक! शाळेतून घरी निघालेल्या ६ वीतील चिमुकलीवर ॲसिड हल्ला; नराधम फरार, अहिल्यानगर हादरलं

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. एका सहावीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर ॲसिड हल्ला करण्यातच आला आहे. हल्ला करुन आरोपी फरार झाला आहे. ही घटना संगम नेर तालुक्यातील वडगाव पान शाळेत घडली आहे. पोलिस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

संगमनेर तालुक्यातील वडगाव पान शाळेमधील इयत्ता सहावी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीवर अज्ञात तरुणाने ॲसिड हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. शाळा सुटल्यानंतर घरी जात असताना अज्ञात व्यक्तीने हे कृत्य केले आहे. यानंतर अल्पवयीन मुलीला उपचारासाठी लोणी येथे हलविण्यात आले आहे. संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील इयत्ता सहावी मध्ये शिकणारी ही अल्पवयीन मुलगी शाळा सुटल्यानंतर घराच्या दिशेने जात होती. यावेळी अचानक तिच्या समोर येऊन अज्ञात एका युवकाने तिच्या चेहऱ्यावरती ॲसिड फेकले. मुलीने आरडाओरड केल्यानंतर आसपासचे नागरिक गोळा झाले. या घटनेची माहिती पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून ॲसिड फेकणाऱ्या तरु-णाचा पोलीस शोध घेत आहेत. दोन दिवसापूर्वी संगमनेर तालुक्यातील रणखांब गावात लग्नाला नकार दिल्याने एका मुलीवर प्राणघातक हल्ला केल्याची घटना ताजी असताना तालुक्यात घडलेल्या दुसऱ्या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.

## मुंबईत १.५ लाखांची लाच घेताना पोलीस अधिकारी अटकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात गेल्या काही महिन्यात एसीबीने कारवाईचा धडका सुरू केला असून महसूल, प्रशासन आणि पोलीस खात्यातही धाडी टाकत अनेकांना लाच स्वीकारताना रंगेहात अटक केली आहे. मुंबईतही काही दिवसांपूर्वी पोलीस अधिकाऱ्यास लाच घेताना अटक केली होती. आता, पुन्हा एकदा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करत खार पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक तुषार काळे यांना लाच घेताना रंगेहात अटक केली. या घटनेमुळे मुंबईच्या पोलीस वर्तुळात खळबळ उडाली असून पोलीस खात्यातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे.

एका प्रॉपर्टी प्रकरणात चौकशीचा अहवाल तक्रारदाराच्या बाजूने देण्यासाठी तुषार काळे याने ३ लाख रुपयांच्या लाचेची मागणी संबंधिताकडे केली होती. त्यानुसार, ठरवल्याप्रमाणे तुषार काळे यास दीड लाख रुपयांचा पहिला हफ्ता देत असताना उइ ने रंगेहात अटक केली. मुंबईतील वांद्रे न्यायालयात हे प्रकरण होते, त्याची चौकशी करण्यासाठी तुषार काळे याला सांगण्यात आले होते. मात्र, याप्रकरणी तक्रारदाराच्या बाजुने अहवाल देण्यासाठी पोलीस अधिकाऱ्याने ला-चेची मागणी केली. मात्र, तक्रारदार आणि एबीसीच्या सतर्कतेमुळे त्याचा डाव फसला अन् तो जाळ्यात अडकला.

## वादळी चर्चेनंतर विधानपरिषदेततही धर्म स्वातंत्र्य विधेयक मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : धर्मपरिवर्तन करण्यापूर्वी ६० दिवस नोटीस देणे अपेक्षित आहे, हा नियम कशासाठी तर धर्मांतर बळजबरीने तर होतं नाही ना याची खात्री करण्यासाठी हा नियम आहे. विरोधक आम्हाला विचारत आहेत की, आकडेवारी आहे का? तर त्यांना सांगणं आहे की जिथं कायदा नाही तिथं तुम्ही आकडेवारी कुठून आणणार असे म्हणत गृहराज्यमंत्री पंकज भोईर यांनी विधानपरिषदेत धर्म स्वातंत्र्य विधेयकावर उत्तर दिले. विधानसभेनंतर विधानपरिषदेत देखील धर्म स्वातंत्र्य बिल मंजूर करण्यात आले. त्यामुळे, लवकरच महाराष्ट्रात धर्म स्वातंत्र्याचा कायदा होणार असून ७ वर्षांच्या शिक्षेची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.


मंत्री पंकज भोईर यांनी विधानसभेत धर्म स्वातंत्र्य विधेयक मांडल्यानंतर सभागृहात गेल्या आठवड्यात विधेयकावर चर्चा झाली. त्यानंतर, काल आणि आज गेल्या विधान परिषदेत दोन्ही बाजुने विधेयकावर चर्चा झाली. अखेर, विधानसभेनंतर विधानपरिषदेतही हे विधेयक बहुमताच्या जोरावर मंजूर झाले. त्यानंतर, आजच कामकाज स्थगित करण्यात आलं आहे. उद्या सकाळी १० वाजता सभागृह सुरू होईल.

पंकज भोईर यांनी बोलताना म्हटले की, धर्मांतर झाल्याची २९ प्रकरणे प्रसाद लाड यांनी समोर आणली. समाजात राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर अन्याय झाला तर सक्षमपणे गुन्हा दाखल करता यावा याची दखल विधेयकात घेतली आहे. बेकायदेशीर धम ांतरला विरोध करण्यासाठी हा कायदा आहे, असेही भोईर यांनी म्हटलं. विधानपरिषदेत आज या विधेयकावर जोरदार चर्चा झाली. शिवसेना ठाकरे गटानेही विधेयकास पाठिंबा दिला, मात्र अनिल परब यांनी जोरदार भाषण केलं. मी बिलाला समर्थन करणार आहे मात्र त्यातील काही बाबींचा उलगडा होणे गरजेचे आहे. हे बिल पक्षांतर बिल आहे की धर्मांतर बिल आहे? कारण पक्षांतर्गत बिलामध्ये ज्या बाबी समाविष्ट होत्या, त्या सगळ्या बाबी या बिलामधे समाविष्ट आहेत. फसवू नये, लाडीगोडी दाखवून पळवून नेणे, आमिष दाखवणे, दिशाभूल करणे ह्या सगळ्या गोष्टी नमूद आहेत. म हाराष्ट्रामध्ये किती भागात कुठल्या समाजात आणि काय कारण होत धर्मांतराची, त्याची माहिती द्यावी. माझी माहिती आहे गरिबी, गरिबीचा आधार घेऊन समाजात घुसून धर्मांतर केलं जातं. मग या सगळ्या गोष्टी देण्याची जबाबदारी सरकारची आहे, असे म्हणत अनिल परब यांनी धर्म स्वातंत्र्यावर विधानपरिषदेत चर्चा केली.

## जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही आता 'स्वीकृत सदस्य'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महापालिका, नगरपालिकांप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही 'स्वीकृत सदस्यां'च्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६' मंगळवारी विधानसभेत मंजूर करण्यात आले. या निर्णयामुळे जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये एकूण १ हजार ५ नवीन सदस्यांची भर पडणार आहे.



ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक क्षेत्र आणि विविध तांत्रिक विषयांतील तज्ज्ञांचा अनुभव प्रशास-नाला मिळावा, या उद्देशाने राज्य सरकारने हे पाऊल उचलले आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी हे विधेयक सभागृहात चर्चेसाठी मांडले होते. विधेयकातील तरतुदींन-ुसार, जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या एकूण सभासद संख्येच्या १० टक्के किंवा किमान ५ सभासद (यापैकी जे अधिक असेल ते) नामनिर्देशित केले जातील. त्याचप्रमाणे, पंचायत समितीमध्ये निवडून आलेल्या एकूण सदस्य संख्येच्या २० टक्के किंवा किमान १ सदस्य नामनिर्देशित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

> **जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही 'स्वीकृत सदस्यां'च्या नियुक्तीचा मार्ग मोकळा**

त्यामुळे राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमधील २ हजार २१० निर्वाचित सदस्यांच्या जोडीला आता २०१ स्वीकृत सदस्य कार्यरत होतील. तर, ३०१ पंचायत समित्यांमधील ४ हजार २४ सदस्यांच्या संख्येत ८०४ नामनिर्देशित सदस्यांची भर पडेल. या नामनिर्देशित सदस्यांना प्रशासकीय कामकाजात सल्ला आणि तांत्रिक मार्गदर्शन देता येईल, मात्र त्यांच्या राजकीय अधिकारांवर काही मर्यादा असतील. त्यांना जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या कोणत्याही सभेतील प्रस्तावावर मतदान करता येणार नाही. हे सदस्य अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती किंवा उपसभापती यांसारख्या पदांच्या निवडीसाठी पात्र ठरणार नाहीत. त्यांचा कार्यकाळ संबंधित परिषद किंवा समितीच्या मुदतीबरोबरच संपुष्टात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.


जिल्हाधिकाऱ्यांमार्फत या सदस्यांचे नामनिर्देशन केले जाणार आहे. हे नामनिर्देशन करताना संबंधित सभागृहातील राजकीय पक्षांचे तौलनिक संख्याबळ आधारभूत मानले जाईल. त्या-त्या पक्षांच्या नेत्यांशी विचारविनिमय करून संख्याबळाच्या प्रमाणात या जागांचे वाटप केले जाईल. नियुक्त सदस्यांची नावे राज्य निवडणूक आयोगाद्वारे शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.


**परिवहन मंत्र्यांनी विधानसभेत दिली माहिती**

## एसटी महामंडळात १७,७४२ पदांची कंत्राटी भरती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एसटी महामंडळात १७,७४२ ड्रायव्हर, कंडक्टर आणि कर्मचाऱ्यांची कंत्राटी भरती केली जाणार आहे. महामंडळाच्या ताफ्यात नव्याने येणाऱ्या ८३०० बसेससाठी ही कंत्राटी भरती केली जाईल. नियमित कर्मचाऱ्यासाठी अर्थ खात्याकडे अर्ज पाठविण्यात आल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मात्र, तोपर्यंत या बसेस चालाव्या म्हणून ही कंत्राटी पद्धतीने भरती करावी लागत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सामान्य प्रवाशांना उत्तम सेवा देणे हेच एसटीचे तसेच सर्व कर्मचाऱ्यांचे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यामुळे काम करताना चालक-वाहकांना भेडसावणाऱ्या दैनंदिन अडचणी, आगार-स्तरावरील निर्णयप्रक्रिया तसेच शिस्तभंग कारवाईच्या बाबतीत न्याय्य आणि पारदर्शक पद्धतीने काम करण्याचे निर्देशही सरनाईक यांनी कर्मचारी संघटनेच्या बैठकीतून दिले आहेत.






एसटी कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्री सरनाईक यांची काल सकारात्मक चर्चा झाली. यावेळी, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी प्रताप सरनाईक यांनी विधान भवनात सोम वारी महत्त्वपूर्ण बैठक बोलावली होती. त्यानंतर, आज विधानसभेत बोलताना त्यांनी नव्याने कंत्राटी भरती केली जाणार असल्याचे सांगितले. लवकरच मुंबईत ३० स्लिपींग कोच बसेस असतील तर १७० बैठ्या खुर्च्यांच्या वोल्वो बसेसही दाखल होती, या दोन्ही प्रकारच्या बसेस मुंबईसाठी मागविण्यात आल्या आहेत. महामंडळाच्या ताफ्यात आम्ही लवकरच ८३०० बसेस समाविष्ट करणार आहोत. त्यासाठी, एसटी महामंडळात १७,७४२ ड्रायव्हर, कंडक्टर आणि कर्मचाऱ्यांची कंत्राटी भरती केली जाणार आहे. म हामंडळाच्या ताफ्यात नव्याने येणाऱ्या ८३०० बसेससाठी ही कंत्राटी भरती केली जाईल, असे सरनाईक यांनी विधानसभेत बोलताना सांगितले.

महायुती सरकारने एसटीतील प्रवाशांबाबत गेल्या काही महिन्यांपासून अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आ-हेत. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना राज्य परिवहन सेवेच्या बसेसमधून मोफत प्रवास करता येईल, अशी घोषणा केली होती. यानंतर राज्यातील महिलांना हाफ तिकिटात एसटीचा प्रवास करता येईल, अर्थात अर्ध्या तिकिटात महिलांना प्रवास करण्याची मुभा दिली. यानंतर आता एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील एकूण रिक्त ११,९१८ पदांपैकी ५०१२ पदांची भरती करण्यासही मान्यता देण्यात आली आहे, अशी माहीती मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिली.

## संपादकीय....

## मार्ग मोकळा

महापालिका, नगरपालिकांप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही 'स्वीकृत सदस्यां'च्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६' मंगळवारी विधानसभेत मंजूर करण्यात आले. या निर्णयामुळे जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये एकूण १ हजार ५ नवीन सदस्यांची भर पडणार आहे. ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक क्षेत्र आणि विविध तांत्रिक विषयांतील तज्ज्ञांचा अनुभव प्रशासनाला मिळावा, या उद्देशाने राज्य सरकारने हे पाऊल उचलले आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी हे विधेयक सभागृहात चर्चेसाठी मांडले होते. विधेयकातील तरतुदींनुसार, जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या एकूण सभासद संख्येच्या १० टक्के किंवा किमान ५ सभासद (यापैकी जे अधिक असेल ते) नामनिर्देशित केले जातील. त्याचप्रमाणे, पंचायत समितीमध्ये निवडून आलेल्या एकूण सदस्य संख्येच्या २० टक्के किंवा किमान १ सदस्य नामनिर्देशित करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील ३४ जिल्हा परिषदांमधील २ हजार २१० निर्वाचित सदस्यांच्या जोडीला आता २०१ स्वीकृत सदस्य कार्यरत होतील. तर, ३०१ पंचायत समित्यांमधील ४ हजार २४ सदस्यांच्या संख्येत ८०४ नामनिर्देशित सदस्यांची भर पडेल. या नामनिर्देशित सदस्यांना प्रशासकीय कामकाजात सल्ला आणि तांत्रिक मार्गदर्शन देता येईल, मात्र त्यांच्या राजकीय अधिकारांवर काही मर्यादा असतील. त्यांना जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या कोणत्याही सभेतील प्रस्तावावर मतदान करता येणार नाही. हे सदस्य अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती किंवा उपसभापती यांसारख्या पदांच्या निवडीसाठी पात्र ठरणार नाहीत. त्यांचा कार्यकाळ संबंधित परिषद किंवा समितीच्या मुदतीबरोबरच संपुष्टात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत या सदस्यांचे नामनिर्देशन केले जाणार आहे. हे नामनिर्देशन करताना संबंधित सभागृहातील राजकीय पक्षांचे तौलनिक संख्याबळ आधारभूत मानले जाईल. त्या-त्या पक्षांच्या नेत्यांशी विचारविनिमय करून संख्याबळाच्या प्रमाणात या जागांचे वाटप केले जाईल.

# सामाजिक सबलीकरणदिन चवदार तळे सत्याग्रह....

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाड सत्याग्रह हा २० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील सार्वजनिक चवदार तळ्याचे पाणी अस्पृश्यांना पिता यावे म्हणून केला होता. यामुळेच २० मार्च हा दिवस 'सामाजिक सबलीकरण दिन' म्हणून भारतात साजरा केला जातो. ही आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली लोकांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन केलेली पहिली सामायिक कृती होती. या सत्याग्रहास महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह, महाडचा मुक्तिसंग्राम किंवा महाडची सामाजिक क्रांती म्हणूनही ओळखले जाते.

भारतीय जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यांना उच्च जातीय हिंदूंपासून वेगळे ठेवण्यात आलेले होते. अस्पृश्यांना पाण्याच्या मुख्य स्रोतामधून पाणी घेण्यास तसेच मुख्य रस्त्यावरून चालण्यास परवानगी नव्हती. ऑगस्ट १९२३ मध्ये मुंबई कायदे मंडळाने एक निर्णय पारित केला. त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या आणि सुस्थितीत ठेवलेल्या सर्व मालमत्तेवर सर्वांना म्हणजेच अस्पृश्यांनाही वहिवाटीचा हक्क असेल. महाडच्या नगरपालिकेनेही जानेवारी १९२४ रोजी ह्या कायद्याची अंमलबजावणी करणारा निर्णय पारित केला. परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालीच नाही.

कोकणातील महाड हे शहर सत्याग्रहासाठी निवडले गेले कारण, उच्च जातीय हिंदूंनी हे धोरण प्रत्यक्षात आणण्यासाठी तयारी दाखवली होती. त्यामध्ये अनंत विनायक चित्रे, गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे, सुरेंद्रनाथ टिपणीस हे महाड नगरपालिकेचे प्रमुखही त्यात सहभागी होते. यांच्यासह अन्य पुरोगामी सामाजिक कार्यकर्ते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहयोगी महाड सत्याग्रह दरम्यान डॉ. आंबेडकरांना मदत करण्याचे काम ते करीत होते. १९२७ साली सुरेंद्रनाथ टिपणीसांनी नगरपालिकेचे प्रमुख म्हणून सर्व सरकारी संपत्ती, सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली केली आणि त्यानिमित्ताने आंबेडकरांना सभा घेण्यासाठी आमंत्रण दिले. सभेनंतर सर्वजण चवदार तळ्याकडे गेले. आंबेडकर सर्वात प्रथम त्या तळ्यामधून पाणी प्यायले आणि त्यानंतर तिथे जमलेले सर्व लोक त्या तळ्यातील पाणी प्यायले. त्यावेळी स्त्री-पुरुष मिळून सुमारे ५००० जण ह्या सभेसाठी आणि नंतर चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी आलेले होते.

डॉ. बाबासाहेबांनी या प्रसंगी जी तात्त्विक भूमिका मांडली, ती अतिशय महत्त्वाची आहे. त्यातील महत्त्वाचे मुद्दे असे -

नेपोलियनने ज्या इंग्लंड देशाला 'दे माय धरणी ठाय' असे केले,त्या देशाने मराठेशाहीचे उच्चाटन केले ह्याचे कारण मराठ्यांतील जातिभेदाची तेढ व आपसातील दुही हे नसून ब्रिटिशांनी एतद्देशीयांचे सैन्य उभारले हे होय. पण ते सैन्य असे अस्पृश्य जातीचे. अस्पृश्यांचे बळ जर इंग्रजांच्या पाठीशी नसते, तर हा देश त्यांना केव्हाही काबीज करता आला नसता.

चवदार तळ्यातील पाणी पशू पीत; पक्षी पीत.

इतकेच काय, पण गोहत्येस धर्म मानणारे मुसलमान नि बायबलाचा ज्याला आधार नाही तो सारा अधर्म अशी शेखी मिरवणारे ख्रिश्चन यांनाही हिंदूंबरोबर चवदार तळ्यावर पाणी पिण्याचा समान हक्क असे.

परंतु युगानुयुगे राम, कृष्ण, विठोबा या हिंदूंच्या देवांना आपले देव म्हणून मानणाऱ्या अस्पृश्य हिंदूंना मात्र सारे सार्वजनिक पाणवठे, विहिरी नि तलाव बंद !

त्या दीनदुबळ्या दलितवर्गीयांनी पाणवठ्यावरून पाणी घेतले तर सवर्ण हिंदूंचा,वेदमूर्तींचा नि धर्ममार्तंडाचा धर्म बुडे धर्म ! त्यांची जगात अप्रतिष्ठा होई ! पत घटे ! संस्कृती कलंकित होई ! धर्माला अधमाचे स्वरूप येते ते असे.

वेदांत जर नीतीचे सिद्धान्त सांगितले नाहीत आणि व्यवहारात जर मातीची व धर्माची आवश्यकता असेल, तर वेदांतील धर्म व्यवहारोपयोगी नाही. असे म्हणण्याऐवजी तो व्यवहारोपयोगी करण्याचे धैर्य ह्या दुबळ्या लोकांत नाही,असे म्हटले पाहिजे. 'धारणाद्धर्मः यतोऽभ्युदय निः श्रेयससिद्धिः स धर्मः ।।' हे मानणारे लोक त्याप्रमाणे आचार नि प्रचार का करीत नाहीत, असे आंबेडकरांनी विचारले. एका हाताने शुद्धी करून हिंदू धर्मात घेणे व दुसऱ्या मार्गाने छळून स्वकीयांना परधर्मात घालविणे म्हणजे श्रद्धानंदप्रणीत शुद्धी नसून ते बेशुद्ध माणसाचे वर्तन आहे. शुद्धिसंघटन चळवळीसंबंधी आमचे असे मत आहे की,हिंदू लोकांना आजच्या काळी शुद्धीपेक्षा संघटनेची विशेष जरूरी आहे.

हिंदूनी मुसलमान होऊन त्या तळ्यातील पाणी भरले तर हिंदू धर्मास विटाळ होत नाही. परंतु हिंदुधर्मीय महार-चांभारांनी त्यातले पाणी भरले तर हिंदु धर्म बुडतो, अशी गर्जना करणाऱ्या धर्मघातकी हिंदूंना त्यांनी बजावले की, है धर्मरक्षण नव्हे, हा धर्मद्रोह आहे.' त्यांनी भीमगर्जना केली की, 'अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक नसून तो आमच्या देहावरील कलंक आहे.

हिंदु संघटनेची आवश्यकता प्रतिपादन करत असता डॉ. आंबेडकर म्हणतात की.....

हिंदू समाजाची शक्ती जातिभेदांमुळे व अस्पृश्यतेमुळे क्षय पावली. अस्पृश्यांचा धिक्कार करून आपल्या उज्ज्वल धर्माला काळिमा लावणाऱ्या पापाचरणी धर्मवेड्या लोकांच्या असल्या अधम कृत्यांपासून परावर्तन करणे हे त्यांचे कर्तव्य होते. हिंदू समाजाची भरती अजिबात बंद झाली असून त्याला सारखी आहोटी लागली आहे, हे उघड्या डोळ्यांनी पाहत असता हिंदू धर्मात आहेत त्यांचा छळ करून लोकविग्रह करण्याच्या दुष्ट प्रयत्नास आळा घालून त्यांना न्यायाने व समतेने वागवून लोकसंग्रह करण्याचा धडा या लोकांना अशा वेळी घालून देणे अवश्य होते. त्यास कोणी ना म्हणेल असे वाटत नाही. हिंदुसभेच्या कार्याची संघटना नि शुद्धी अशी दोन कार्ये आहेत. या दोन कार्यांपैकी आमच्या मते संघटना हेच जास्त महत्त्वाचे कार्य आहे. आमचे असे मत आहे की हिंदूनी आपले संघटन केले, तर शुद्धीची काही आवश्यकता उद्भवणार नाही. हिंदूंनी चातुर्वर्ण्य नष्ट करून एकवर्णी समाज करावा.

नंतर १९ मार्च १९४० रोजी डॉ. आंबेडकर यांनी महाडमधे १४ वा महाड सत्याग्रह दिन आयोजित केला. महाड शहरात डॉ. आंबेडकर यांचा मोर्चा व सभा झाली. या दिवशी महाड नगरपालिका प्रेसिडेंट, विष्णु नरहरी खोडके यांनी एक समारंभ आयोजित करून आंबेडकर यांना मानपत्र देऊन गौरविले. खोडके यांनी १९३१ पासून डॉ. आंबेडकर यांच्या चळवळींना पाठिंबा दिला होता. ह्या सत्याग्रहासाठी स्त्रियांचा सहभाग लक्षणीय असल्याने आंबेडकरांनी स्त्रियांना खास आवाहन केले आणि आपली जात दाखवणारी कोणतीच लक्षणे आपल्या शरीरावर न बाळगण्याविषयी उपस्थित स्त्री-पुरुषांना आवाहन केले. त्यातच पुरुषांनाही हातात कायम काठी ठेवण्यासारखी चिन्हे बाळगण्याची आता गरज नाही. तत्कालिक स्त्रिया गुडघ्यापर्यंतच तोकडे लुगडे नेसत असत. आंबेडकरांनी स्त्रियांना इतर उच्च जातीय स्त्रीयांसारखे पूर्ण टाच घोळ लुगडे नेसण्याचे सुचवले. त्याची अंमलबजावणी लागलीच पुढच्या काही दिवसांतच घडून आली.

**संदर्भ – डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्रग्रंथ**
**लेखक – धनंजय कीर**

# सिलिंडर दरवाढीचा फटका : व्यावसायिक आणि ग्राहक दोघेही गॅसवर!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता केवळ सीमांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो थेट सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर उमटताना दिसत आहे. कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये होणारे चढ-उतार, पुरवठा साखळीतील अडथळे, जहाजवाहतुकीवरील वाढते खर्च आणि आंतरराष्ट्रीय राजकीय तणाव यामुळे ऊर्जा क्षेत्रात मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. भारत हा आपल्या गरजांपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करणारा देश असल्यामुळे जागतिक बाजारातील प्रत्येक हालचालीचा परिणाम देशातील इंधन दरांवर होतो. याच पार्श्वभूमीवर एलपीजी गॅसच्या दरात झालेली वाढ ही केवळ आर्थिक बाब राहिलेली नसून ती सामाजिक आणि जीवनावश्यक प्रश्न बनली आहे. आज परिस्थिती अशी आहे की, सिलिंडर महाग झाल्यामुळे व्यावसायिक आणि ग्राहक दोघेही अक्षरशः गॅसवर आले आहेत.

गेल्या दशकात भारताने स्वच्छ इंधनाकडे मोठी झेप घेतली. देशात आज ३० कोटींहून अधिक एलपीजी ग्राहक आहेत आणि प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत सुमारे ९.६ कोटी महिलांना गॅस कनेक्शन देण्यात आले आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागात स्वयंपाकघरात मोठा बदल घडून आला. धूरमुक्त वातावरण, महिलांच्या आरोग्यात सुधारणा आणि वेळेची बचत यामुळे सामाजिक स्तरावर सकारात्मक परिणाम झाला. परंतु आज वाढत्या गॅस दरांमुळे या यशासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे. कनेक्शन मिळाले, पण ते टिकवणे कठीण होत चालले आहे. घरगुती गॅस सिलिंडरचा दर २०१४ मध्ये सुमारे ४५० ते ५०० रुपयांच्या आसपास होता, तो आता अनेक शहरांमध्ये ९०० ते ११०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. काही काळ अनुदानामुळे ग्राहकांना दिलासा मिळाला होता; मात्र सध्या अनुदान मर्यादित झाल्यामुळे हा वाढलेला खर्च थेट ग्राहकांवर पडत आहे.

याहूनही गंभीर परिस्थिती व्यावसायिक गॅसच्या बाबतीत दिसून येते. हॉटेल्स, उपाहारगृहे, ढाबे आणि लहान खाद्य व्यवसाय पूर्णपणे एलपीजीवर अवलंबून असतात. व्यावसायिक सिलिंडरचा दर सध्या १८०० ते २५०० रुपयांच्या दरम्यान आहे. एका मध्यम हॉटेलला महिन्याला २० ते ३० सिलिंडर लागतात. म्हणजे केवळ गॅसवरच महिन्याला ४० हजार ते ६० हजार रुपयांपर्यंत खर्च येतो. दरवाढीनंतर हा खर्च आणखी वाढतो. परंतु ग्राहकांची क्रयशक्ती मर्यादित असल्यामुळे अन्नपदार्थांच्या किमती वाढवणे शक्य होत नाही. परिणामी नफा घटतो, व्यवसाय तोट्यात जातो आणि काही ठिकाणी हॉटेल्स अक्षरशः बंद पडण्याच्या उंबरठ्यावर पोहोचली आहेत. ही परिस्थिती केवळ व्यवसायिकांपुरती मर्यादित नाही; या क्षेत्राशी जोडलेली रोजगार साखळी-कामगार, पुरवठादार, वाहतूकदार-सर्वांवर त्याचा परिणाम होत आहे.

दुसरीकडे सामान्य ग्राहकांची कोंडी अधिकच गंभीर आहे. देशातील मोठा वर्ग अजूनही १०,००० ते १५,००० रुपयांच्या मासिक उत्पन्नावर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत १००० रुपयांचा गॅस सिलिंडर हा त्यांच्या घरगुती बजेटवर मोठा ताण आणतो. परिणामी अनेक कुटुंबे गॅसचा वापर कमी करून पुन्हा लाकूड, कोळसा किंवा इतर पारंपरिक इंधनाकडे वळतात. यामुळे घरातील वायूप्रदूषण वाढते आणि महिलांच्या तसेच मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, घरातील धूर हा श्वसनविकारांचे एक मोठे कारण आहे. म्हणजेच, गॅस दरवाढ ही केवळ आर्थिक समस्या नसून ती आरोग्याशीही संबंधित आहे.

या संपूर्ण परिस्थितीकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहिले, तर ऊर्जा हा केवळ इंधनाचा प्रश्न राहिलेला नाही, तर तो सामाजिक स्थैर्य, आर्थिक संतुलन आणि राष्ट्रीय सुरक्षेशी जोडला गेला आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती ७० ते १०० डॉलर प्रति बॅरल या दरम्यान अस्थिर आहेत. यामुळे एलपीजीसारख्या इंधनांच्या किमतींमध्ये सातत्याने बदल होत आहेत. अनेक देश ऊर्जा पुरवठ्याचा वापर रणनीतिक साधन म्हणून करताना दिसतात. अशा परिस्थितीत भारतासारख्या आयात-आधारित देशासाठी ऊर्जा सुरक्षितता हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठरतो.

या पार्श्वभूमीवर देशांतर्गत धोरणांमध्ये बदल करण्याची गरज आहे. सर्वप्रथम, गरजूंना लक्ष्यित आणि प्रभावी अनुदान देणे अत्यावश्यक आहे. विशेषतः उज्ज्वला योजनेतील लाभार्थ्यांसाठी अतिरिक्त सवलती दिल्यास त्यांचा गॅस वापर टिकवून ठेवता येईल. दुसरे म्हणजे, व्यावसायिक गॅसच्या दरांमध्ये काही प्रमाणात सवलत देऊन हॉटेल उद्योगाला दिलासा देणे गरजेचे आहे, कारण हा उद्योग मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करतो. तिसरे म्हणजे, पर्यायी ऊर्जेच्या स्रोतांकडे वेगाने वळणे आवश्यक आहे. बायोगॅस, सौर ऊर्जा आणि विद्युत स्वयंपाक यांसारख्या उपायांचा प्रसार केल्यास एलपीजीवरील अवलंबित्व कमी होऊ शकते.



ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने भारताने आयात स्रोतांचे विविधीकरण करणे, रणनीतिक साठे निर्माण करणे आणि स्थानिक ऊर्जा उत्पादनाला चालना देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात सामुदायिक बायोगॅस प्रकल्प उभारले, तर स्वयंपाकासाठी स्वस्त आणि स्थानिक पर्याय उपलब्ध होऊ शकतात. यामुळे केवळ गॅसवरील अवलंबित्व कमी होणार नाही, तर पर्यावरणीय दृष्ट्याही सकारात्मक परिणाम होईल.

शेवटी, आजची परिस्थिती आपल्याला एक स्पष्ट संदेश देते-जागतिक घडामोडींचा परिणाम थेट आपल्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचतो. सिलिंडरच्या वाढत्या किमतींनी व्यावसायिक आणि ग्राहक दोघांनाही गॅसवर आणले आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे केवळ दरवाढ म्हणून न पाहता, एक व्यापक सामाजिक, आर्थिक आणि धोरणात्मक संकट म्हणून पाहणे आवश्यक आहे.

आजचा खरा प्रश्न असा आहे की-गॅस उपलब्ध आहे, पण तो सर्वसामान्यांना परवडणार आहे का? आणि याचेच उत्तर भारताच्या ऊर्जा धोरणाची दिशा तसेच सामान्य माणसाचे भवितव्य ठरवणार आहे.

**– डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

## पियुष चोपडे यांना मिळाले सहा पुरस्कार

### अध्यक्ष अशोक भोसले यांच्या हस्ते पियुष चोपडे यांचा सत्कार

# स्वेरीच्या रा.से.यो. स्वयंसेवकांची राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : राज्यस्तरीय 'उत्कर्ष – २०२६' या सामाजिक व सांस्कृतिक महोत्सवाकरिता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचा संघ निवडला गेला होता. त्यामध्ये गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मधील पियुष सुनील चोपडे व गौरी शिवलिंग महाजन या दोन राष्ट्रीय सेवा योजनेच्या (रा.से.यो.) स्वयंसेवकांची निवड झाली होती. त्यात पियुष चोपडे यांना विविध उपक्रमात तब्बल सहा पुरस्कार मिळाले यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या सांस्कृतिक महोत्सवामध्ये विविध स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागात दुसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या पियुष सुनील चोपडे यांनी स्ट्रीट प्ले (ग्रुप इव्हेंट) स्पर्धेत प्रथम क्रमांक, काव्य वाचन स्पर्धेत द्वितीय क्रमांक, तसेच सांस्कृतिक रॅली स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले तसेच राष्ट्रीय सेवा योजना निदेशालय, भुवनेश्वर यांच्या वतीने रा.से.यो. स्वयंसेवकांसाठी ओरिसा राज्यातील बारीपदा मधील महाराजा श्रीरामचंद्र भंजदेव (एमएसबीबी) युनिव्हर्सिटी येथे दि.२२ फेब्रुवारी ते दि. २६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राष्ट्रीय एकत्रीकरण शिबीर (एनआयसी) या राष्ट्रीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर मधील पियुष सुनील चोपडे यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संघामध्ये निवड झाली होती. या शिबिरामध्ये झालेल्या विविध स्पर्धांमध्ये पियुष चोपडे यांनी सांघिक चर्चा (ग्रुप डिस्कशन) मध्ये द्वितीय क्रमांक, एक्सटेम्पोर मध्ये द्वितीय क्रमांक, तसेच रील मेकिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली. याशिवाय राष्ट्रीय युवा संसद महोत्सव (एनवायपीएफ)- २०२६ साठी दि. १० मार्च २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे झालेल्या अंतिम जिल्हास्तरीय निवड प्रक्रियेमध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील पियुष चोपडे व सोनाली कांबळे या दोन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय (मुंबई) स्पर्धेसाठी निवड झाली. यशस्वी विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ रा.से.यो. विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, पंढरपूर विभागाचे रा.से.यो. विभाग प्रमुख डॉ. संजय मुजमुले, स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विभागप्रमुख डॉ. पी. ए. सातारकर, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे व इतर प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभत आहे. यावेळी स्वेरीच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत पियुष चोपडे यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य बी.पी.रोंगे, अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# लढय्य पँथर शंकर कांबळे यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : दहिटणा ता. तुळजापूर येथील लढाय्य पँथर,भिमशाहीर गायरान जमिनीच्या लढाईतील विजयाचे एक शिलेदार आंबेडकरी चळवळीतील खंबीर आणि अष्ठपैलू नेतृत्व शंकर कांबळे यांचे दि.१६ मार्च २२६ रोजी रात्री ९.०० वा. दरम्यान अल्पशा आजाराने वयाच्या ६७ व्या वार्षी दुःखद निधन झाले.



नामदार रामदासजी आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली वादळी दलित पँथर च्या चळवळीतील एक धाडसी कार्यकर्ते म्हणून शंकर कांबळे हे सर्वत्र परिसरात परिचित होते. तसेच राजरत्न गायन पार्टी दहिटणा चे हार्मोनियम (पेटी ) वादक, गायक, झेलकरी कलावंत होते. आपल्या पहाडी आवाजातून बुद्ध -फुले -शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार भीम गीत गायनाच्या माध्यमातून करणारा एक भिम शाहिर म्हणूनही त्यांची वेगळी ओळख होती.

नामदार रामदास आठवले साहेब यांच्या वादळी दलित पँथरच्या चळवळीमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेऊन त्यांच्या एकूणच सामाजिक राजकीय आणि धम्म चळवळीला सुरुवात केली होती. दरम्यानच्या काळात कसेल त्याची जमीन,राहील त्याचं घर, नसेल त्याचं काय

या विचारातून भूमिहीन दलित कुटुंबांना त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी किमान कोरडवाहू चार एकर जमीन किंवा दोन एकर बागायत जमीन शासनाने द्यावी या मागणीसाठीचा लढा सबंध महाराष्ट्रभर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या माध्यमातून कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली चालू होता. त्या नंतर भारतीय दलित पँथार च्या माध्यमातून नामदार रामदास आठवले साहेब यांनी तो सुरू ठेवला आणि आजही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या माध्यमातून हा लढा सुरूच आहे.या गायरान जमिनीच्या लढ्यामध्ये शंकर कांबळे यांनी आपल्या कार्यकर्त्यासमवेत धाडसाने.सहभाग घेतला आणि तुळजापूर तालुक्यातील आपल्या गावी दहिटणा येथील शिवारात असलेल्या शासकीय गायरान जमिनीवर अतिक्रमण करून ती जमीन दलित भूमिहीन कुटुंबांना त्यांच्या उदरनिर्वासाठी कसून खाण्याकरता मिळाली पाहिजे यासाठी ची लढाई सुरू केली आणि नामदार रामदास आठवले साहेब व धाराशिव ( उस्मानाबाद) जिल्ह्याचे स्थानिक पातळीवरिल नेतृत्व यांच्या माध्यमातून हा लढा यशस्वी झाला. या मध्ये त्यांचे मोठे बंधू माजी सैनिक मेजर वसंत कांबळे यांचा ही मोठा अधार होता. सर्वांच्या सहभागातून हा गायरान जमिनीचा लढा यशस्वी झाला.आणि दहिरणा येथिल भुमिहीन दलित कुटुंबांना जमीन मिळाली. ते जमीनदार झाले.यागायरान जमिनीच्या यशस्वी लढाईतील एक शिलेदार म्हणजे शंकर कांबळे.

त्यांच्या दुःखाद निधना बद्दल त्याना भावपूर्ण श्रद्धांजली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# नागरिकांनी ग्राहक हक्क कायद्याविषयी नेहमी जागरूक राहावे

## अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी; अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, दिनांक १७ (जिमाका) : - देशभरात १५ मार्च हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. ग्राहक हा कोणत्याही अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. ग्राहकांचे हक्क सुरक्षित राहिले तरच सम ाजात न्याय, पारदर्शकता आणि विश्वास टिकून राहील. आजच्या डिजिटल युगात ग्राहकांना माहिती मिळविण्याचे अनेक मार्ग उपलब्ध झाले आहेत, परंतु त्याचबरोबर फसवणुकीचे प्रकारही वाढले आहेत. त्यामुळे ग्राहकांनी आपले हक्क व ग्राहक कायद्याविषयी जागरूक रहावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले. जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले, त्याप्रसंगी ते अध्यक्ष स्थानावर मार्गदर्शन करत होते.

**अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त बहुउद्देशीय सभागृहाबाहेर लावण्यात आलेल्या विविध शासकीय स्टॉलला भेट देऊन पाहणी केली.**

यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, जिल्हा अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी निलेश देठे, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे शासकीय व अशासकीय सदस्य राजेंद्र घाडगे, नंदकुमार देशपांडे, शशिकांत हरिदास, किरण भांगे, स्वप्निल वाघमारे, यशवंत फडतरे, तानाजी गुंड विविध शासकीय विभागाचे अधिकारी, विद्यार्थी आदि उपस्थित होते.

ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षा भारती सोलवंडे यांनी ग्राहक हक्क कायद्याविषयी माहिती दिली. तसेच वस्तुची गुणवत्ता व दर्जा याकडे ग्राहकांनी लक्ष देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी प्रास्ताविकात केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यासाठी डरषश झीर्वीली, उेपषळवशपीं उेपीींशी संकल्पना निश्चित केली असल्याची माहिती दिली. तसेच ग्राहक हक्क कायद्याने ग्राहकांना दिलेल्या हक्काची माहिती ही त्यांनी यावेळी सविस्तरपणे दिली. सध्याचे डिजिटल युगात ऑनलाईन खरेदी ही ग्राहकाकडून मोठ्या प्रमाणावर केली जात आहे. तसेच या ठिकाणीही ग्राहकांची फसवणूक होऊ शकते तरी ऑनलाईन खरेदी विषयी ग्राहकांनी जागरूक राहिले राहण्याचे आवाह-नही यावेळी त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद सदस्य राजन घाडगे यांनी केले. यावेळी रमेश खाडे यांनी महाराष्ट्र गीत सादर करुन ग्राहक प्रबोधनपर पोवाडा सादर केला.

स्टॉल - राष्ट्रीय ग्राहक दिनानिमि त्त जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या



परिसरात पोलीस आयुक्तालय सोल-ापूर शहर, वैद्यमापनशास्त्र यंत्रणा, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी सोलापूर, सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन, परिवहन विभाग, कृषी विभाग, आरोग्य विभाग विक्रीकर विभाग आदी विभागांचे माहितीपर स्टॉल लावण्यात आलेले होते.

# तरुण भारत माजी कर्मचारी समितीतर्फे कारंजकर, वडतिले, म्याकल, बसाटे, तडवळकर यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : तरुण भारत माजी कर्मचारी समितीतर्फे तरुण भार-तचे माजी संपादक नारायण कारंजकर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सत्कार करण्यात आला. तसेच तरुण भारतच्या म ाजी कर्मचाऱ्यांच्या विविध पदावर नियुक्ती झाली. त्यांचाही समि तीतर्फे सन्मान करण्यात आला.



जुळे सोलापूरातील श्री द्वारकाधीश मंदिरात हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून तरुण भारतचे माजी संपादक अरुण करमरकर, तरुण भारतचे माजी संपादक अरविंद जोशी, नारायण कारंजकर, सौ.सुमती कारंजकर आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी श्री.कारंजकर आणि सौ. कारंजकर यांचा शाल,श्रीफळ, पूर्ण पोशाख देऊन सत्कार करण्यात आला. तसेच रमेश बसाटे यांची सोलापूर जिल्हा मध्यवर्ती ग्राहक भांडारच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल, दशरथ वडतीले यांची औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल, ज्ञानेश्वर म्याकल यांची स्वीकृत नगरसेवक आणि महावीर बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल तसेच रोहिणी तडवळकर यांची स्वीकृत नगरसेवक आणि भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

यावेळी तरुण भारतचे माजी संपादक अरुण करमरकर म्हणा-ले, नारायण कारंजकर यांनी आयुष्यभर ज्योतिषशास्त्राची सेवा केली आहे. ज्योतिषशास्त्राच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य नागरिकांचे जीवन सुसह्य करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. केवळ ज्योतिष शास्त्राचा अभ्यास नव्हे तर आयुर्वेदातील अनेक गोष्टींचे ज्ञानही कारंजकर होते,त्यामुळे आयुर्वेदाच्या माध्यम ातून त्यांनी अनेक जुनाट रोगांवर उपचारही केले. तरुण भारतच्या माजी कर्मचाऱ्यांची विविध संस्थांवर निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून करम रकर म्हणाले वृत्तपत्रात केलेल्या कामाच्या अनुभवावरती हे सर्व कर्मचारी आपापल्या क्षेत्रात अत्यंत प्रामाणिकपणे आणि कर्तव्य भावनेने आपली जबाबदारी निश्चितपणे पार पाडतील.

तरुण भारतचे माजी संपादक अरविंद जोशी म्हणाले, कारंजकर यांनी पत्रकारिता, आयुर्वेद, ज्योतिष शास्त्र आणि पर्यटन अशा वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या काम ाचा त्यांनी ठसा उम टवला आहे. ज्योतिष शास्त्राच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्यांच्या जीवनात येणारे अनेक छोटे छोटे प्रश्न अतिशय सहजरित्या सोडविण्याचे मार्ग सांगून सामान्यांच्या जीवनात दिलासा दिला आहे. आजीबाईचा बटवा या माध्यम ातून त्यांनी भारताची प्राचीन असणारी वैद्यकीय उपचार पद्धती अंगीकारण्यासाठी प्रयत्न केले. पत्रकारीतेमध्येही त्यांनी उत्कृष्ट लिखाण करून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. याशिवाय नोकरीच्या निमित्ताने त्यांनी सोलापूर कुर्डूवाडी असा दररोज प्रवास केलेला आहेच याशिवाय भारतातील जवळपास सर्वच मोठी आध्यात्मिक तीर्थक्षेत्रे आणि ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन पर्यटनाचाही आनंद घेत-लेला आहे.

सत्काराला उत्तर देताना कारंजकर यांनी आपला जीवन प्रवास उघडून दाखविला. ज्ञानेश्वर म्याकल यांनी तरुण भारत मधील कामाचा अनुभव आपल्याला भावी काळात उपयोगी पडेल. असे सांगितले. रोहिणी तडवळकर यांनी आपल्या मनोगतात तरुण भारतने नेहमीच आपल्याला सहकार्य आणि मार्गदर्शन केल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत आणि सूत्रसंचालन समि ती सदस्य दत्ता आराध्य यांनी केले. माजी संपादक अनिल कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. राजेंद्र खमितकर यांनी उपस्थित पाहुण्यांचा परिचय करून दिला तर सतीश पाटील यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास तरुण भार-तचे संपादक प्रशांत माने, मानसी मोकाशी, दिलीप कुलकर्णी, पुरुषोत्तम कारकल, शरणप्पा शाबादे यांच्यासह तरुण भारतचे आजी-माजी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुधाकर रणदिवे यांना नेताजी सुभाषचंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/ प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मौजे ईटकुर येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार सुधाकर माणिकराव रणदिवे यांना महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य)यांच्या वतीने नेताजी सुभाष चंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार- (२०२६) जाहीर करण्यात आला आहे. सुधाकर रणदिवे यांनी सामाजिक क्षेत्रात व शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे त्यांनी गरजु विद्यार्थ्यांना ही अनेक वेळा शैक्षणिक साहित्य देऊन मदत केली आहे. त्या कार्याची दखल घेत. संघटनेच्या वतीने या बाबत त्यांना पत्राद्वारे कळविले आहे. या पत्रात असे म्हटले आहे की,महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन (महाराष्ट्र राज्य) ही एक सामाजिक परिवर्तन, न्याय,तसेच पुरोगामी लोकहितवादी संघटना असून या संघटनेच्या माध्यमातून जवळपास (२००७) पासून विविध

**महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशनच्या वतीने दिला पुरस्कार**

क्षेत्रातील सामाजिक प्रश्नावर न्याय व हक्कासाठी कार्य करणाऱ्या डॉक्टर, वकील, पत्रकार, राजकीय नेते, समाजसेवक, इंजिनिअर, शिक्षक,कृषी क्षेत्रामध्ये काम करणारे व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, इलेक्ट्रॉनिक्स मीडिया क्षेत्रातील कार्य करणाऱ्या व्यक्ती यांना संघटनेच्या वतीने नेत-ाजी सुभाषचंद्र बोस राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. याच माध्यमातुन सुधाकर रणदिवे यांच्या सामाजिक व पत्रकारीता क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. लवकर एका कार्यक्रमात त्यांना पुरस्कार देण्यात येणार आहे.सदरील पुरस्कारामुळे समाजातील विविध क्षेत्रा-तील समाजसेवेचे कार्य करणाऱ्या समाजसेवकांना समाजकार्यात प्रोत्स-ाहन मिळावे, त्यांचा समाज कार्यातील उत्साह वाढावा हा संघटनेचा मुख्य उद्देश आहे. सदरील पुरस्कार पत्रावर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीराम घुले, उपाध्यक्ष बालाप्रसाद सोमानी, संस्थापक सचिव सुफी सय्यद शमशोद्दीन यांच्या स्वाक्षर्या आ-हेत. सुधाकर रणदिवे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## कालकथित लक्ष्मीबाई शंकर धिवार यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन साजरा

## राष्ट्रीय समजप्रबोधन कीर्तनकार ज्ञानेश्वर महाराज वाबळे

# आईचे गर्भाशय हे मुलांच्या संस्काराचे विद्यापीठ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड :

राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले यांचे मूळ गाव खानवडी येथील रहिवासी आणि बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल तात्या धिवार यांच्या मातोश्री कालकथित लक्ष्मीबाई शंकर धिवार यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन राष्ट्रीय समाज प्रबोधन कीर्तनकार ह भ प ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांच्या समाज प्रबोधन रुपी किर्तन सेवेने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवा-तीला भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य दादासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बौद्ध धम्मातील सूत्तपठणाचा विधी पार पाडण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले, सावित्रीमाई फुले यांच्या पुतळ्याला राष्ट्रीय समाज प्रबोधनकार ह.भ.प .ज्ञा-नेश्वर महाराज वाबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. महापुरुषांच्या घोषणांचा जय घोष करण्यात आला. महाकारूणी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि विश्वरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तसेच कालकथित लक्ष्मीबाई शंकर धिवार यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून त्रिशरण,पंचशील हा विधी घेण्यात आला.सर्व उपस्थितांना धम्मदेसना देण्यात आली. बौद्ध विधीनुसार अभिवादन कार्यक्रम पार पाडण्यात आला. यावेळी कालकथित लक्ष्मीबाई शंकर धिवार यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थ-ानी रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे नेते विष्णू दादा भोसले होते. यावेळी सामाजिक राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या वतीने बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल तात्या धिवार यांच्या मातोश्री कालकथित लक्ष्मीबाई यांचा जीवनपट आणि त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. शेवटची आदरांजली राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते माणिकराव झेंडे पाटील यांनी वाहिली. या मातेचा जी-वनपट आणि तिच्या आठवणी सांगत असताना अनेक म ान्यवरांनी सांगितले की या मातेच्या संस्कारामुळेच सुनील तात्या धिवारांसारखा पुत्र आज समाजात गोरगरीब जनतेची सेवा करताना दिसत आहे. या म ातेच्या शिकवणी मुळेच हे कुटुंब आदर्श कुटुंब म्हणून समाजात नावारूपाला आलेले आहे. अध्यक्षीय भाषणात रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे नेते विष्णू दादा भोसले म्हणाले की ही माता अशिक्षित होती का सुशिक्षित होती हे महत्त्वाचे नव्हते तर ती एक आदर्श संस्कारक्षम माता होती.म्हणूनच सुनिल तात्या धिवार यांच्यासारखा आदर्श पुत्र बहुजन हक्क परिषदेच्या वतीने चांगले समाजकार्य करत आहे. आहे. धिवार कुटुंबाची संपूर्ण वाटचालच या मातेने दिलेल्या संस्कार वर चालू आहे.

यानंतर राष्ट्रीय समाज प्रबोधन कीर्तनकार ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांचे समाज प्रबोधन पर किर्तन झाले. या कीर्तनामध्ये त्यांनी समाजा-तील अनेक अनिष्ट चाली रूढी परंपरा, अंधश्रद्धा यावर त्यांनी प्रबोधन केले. वारकरी पंथ हा बुद्ध धम्माचीच परंपरा आहे. बुद्ध धम्मातील त्रिशरण आणि पंचशीलाचे जर प्रामाणिकपणे आज कोण पालन करीत असेल तर तो पंथ आहे वारकरी पंथ. आपल्या समाज प्रबोधनरुपी किर्तन सेवेतून प्रबोधन करताना ते म्हणाले की आईचा गर्भ हा म ुलांच्या संस्काराचे पहिले विद्या-पीठ आहे. त्यामुळे मूल हे गर्भात असताना आईने महापुरुषांचे विचार ऐकले पाहिजेत, पुस्तके वाचली पाहिजेत. राष्ट्रमाता जिजाऊंनी छत्रपती शिव-ाजी महाराज गर्भात असताना जास्त प्रेरणादायी पुस्तके वा-चली म्हणूनच छत्रपती शिव-ाजी महाराजांना स्वराज्य निर्माण करता आले. आजच्या महिला मूल गर्भावस्थेत असताना टीव्ही सिरीयल मधील नको त्या मालिका बघतात आणि तेच संस्कार गर्भातील मुलावर होतात.

परिणामी मूल जन्माला आल्यानंतर चुकीच्या मार्गावर जाते याला कारण तुम्ही गर्भावस्थेत काय करता यावर मुलाचे भविष्य अवलंबून असते. कारण मुलाची नाळ ही मातेच्या उदराशी जोडलेले असते. म ाता जसे विचार करेल तसेच मुल घडत असते. म्हणून मुल गर्भअवस्थेत असताना चांगली संस्कारक्षम , प्रेरणादायी आणि महापुरुषांचे विचारांची पुस्तके वाचा म्हणजे पुढची पिढी चांगली घडेल. तरुणांना संदेश देत असताना त्यांनी सांगितले की व्यसनांपासून दूर राहा. माणसाने माणसाशी भेदाभेद न करता माणसासारखे वागा. हा जन्म पुन्हा नाही. यावेळी त्यांनी वेदातील अनिष्ट प्रथांवरही प्रहार केला. संतांचे विचार हे बुद्धांचेच विचार आहेत असेही त्यांनी ठणकावून सागितले.कीर्तन हे विचारपीठ सत्य सांगण्याचे आहे. बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनील तात्या धिवार यांच्या विषयी समाज प्रबोधनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे कीर्तनामध्ये सांगताना म्हणाले की मुलगा कसा असावा तर सुनिल तात्या सारखा असावा.आईची सेवा कशी करावी याचे उत्तम उदाहरण म्हणजे सुनील तात्या. कोरोनाची आठवण सांगत असताना ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे म्हणाले की सुनील तात्या धिवार यांच्या मुलीला कोरोनाच्या काळामध्ये कोरोनाची लागण झाली तर त्यांनी मुलगी दीक्षा हिला कोरोनटाइन केले.वेगळ्या खोलीत ठेवले.आणि कुटुंबातील इतर सदस्यांचे कोरोनाचे टेस्ट करणे त्यावेळेस बंधनकारक असायचे. घरातील स्वतःची,म ुलाची, पत्नीची आणि आईची कोरोनाचे टेस्ट करून घेतली आणि त्यामध्ये ही माऊली लक्ष्मी आई हिची कोरोनाची टेस्ट पॉझिटिव्ह आली. सुनिल तात्यांनी जेव्हा आईला कोरोनाचे लागण झाली असे समजले तेव्हा त्यांनी आईला वेगळे न ठेवता कॉरंटाईन न करता आईला घरातच सगळ्यांच्या समवेत ठेवलं. घरातील सगळ्यांना सांगितलं आईला आपण वेगळं ठेवायचं नाही आईबरोबर आपण सगळेच एकत्र राहू.तिला कळू द्यायचं नाही की तिला कोरोना झाला आहे म्हणून. नाहीतर ती घाबरूनच तिचं काहीतरी बरं वाईट होईल. काहीही झालं तरी तिला आपल्यापासून वेगळं ठेवायचं नाही एक वेळ आपण सगळे एकत्र मरू पण मी माझ्या आईला वेगळं ठेवायचं नाही. आजच्या काळात केवढी ही मातृभक्ती.स्वतःच्या जीवाची आणि बायका मुलांच्या पेक्षा आईवर जीव लावणारा हा सु-नील तात्या एक आदर्श पुत्र आहे. धन्य ती माऊली आणि धन्य तिची कुस. ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज वाबळे महाराज यांचे सत्कार बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल तात्या धिवार यांच्या हस्ते शाल देऊन करण्यात आले.यावेळी छत्रपती संभाजीनगर वरून खास पुण्यस्म रण कार्यक्रमासाठी आलेले गाथा चिंतन ट्रस्टचे ह.भ. प. डॉक्टर बालाजी जाधव यांच्या वतीने ह.भ. प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांना श्री संत तुकाराम म हाराजांचा सार्थ नीतीबोध गाथा व संत तुकाराम महाराजांची प्रतिमा भेट देण्यात आली. ह.भ.प. डॉक्टर बालाजी महार-ाज जाधव यांचा सत्कार बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल तात्या धिवार यांच्या हस्ते शाल घालून करण्यात आला.कार्यक्रमाची सांगता बौद्ध धम्मातील धम्मपालन गाथा घेऊन करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्वांच्या वतीने कालकथित लक्ष्मीबाई शंकर

धिवार यांना सामुदायिक अभिवादन करून श्रद्धांजली वाहण्यात आली.यावेळी विविध क्षेत्रातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, उद्य-ोग क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते. तसेच सुनिल तात्या धिवार यांच्या कुटुंबावर प्रेम करणारे त्यांचे आप्तेष्ट,नातेवाईक,सगेसोयरे, मित्रपरिवार, जिल्हा परिषद व पंचायत समितीतील सर्व आजी माजी सदस्य ,बहुजन हक्क परिषदेतील सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते,पत्रकार बंधू,पुरंदर तालुका पत्रकार संघाचे सदस्य,विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी,कार्यकर्ते,

मित्रपरिवार तसेच खानवडी व पंचक्रोशीतील सर्व आजीमाजी ग्रामपंचायत सरपंच,सदस्य,म ोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

यावेळी सुनील तात्या धिवार यांच्या कुटुंबीयांच्या वतीने अन्नदान करण्यात आले. उप-स्थित सर्वच मान्यवरांचे आभार बहुजन परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल तात्या धिवार यांनी मानले.

# कलेच्या नावाखाली वेश्या व्यवसाय; स्वरांजली केंद्रावर धाड

## २५ महिलांची सुटका; सोलापुर पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांची कारवाई, मोठे रॅकेट उघड होणार, केंद्राला टाळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापुर / प्रतिनिधी : माढा तालुक्यातील मोडनिंब येथील स्वरांजली कला केंद्रावर सुरु असलेल्या वेश्या व्यवसाय रॅकेटचा सोलापूर पोलिसांनी सापळा रचून पर्दाफाश करीत २५ पिडीत महिलांची सुटका केली. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शना खाली टेंभुर्णी ठाण्याचे प्रभारी पोलिस अधिकारी तथा परिविक्षाधीन आयपीएस राहूल आत्राम यांनी नियोजनबद्ध सापळा रचून छापा टाकला. पोलिस याचा तपास करीत असुन मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता आहे.

स्वरांजली कला केंद्राचे मालक जगन्नाथ तुकाराम घाडगे (रा. अरण ता. माढा) कलाकेंद्राचे चालक विशाल लता पवार (वय २४ रा. जामखेड ता. अहिल्यानगर) मॅनेजर बाळासाहेब गोविंद गिड्डे (वय ६३ रा. अरण ता. माढा) पार्टी मालकीन छाया बाळासाहेब सुरवसे (वय ३५ रा. आंबेजोगाई जि. बीड) रिक्षा-चालक नितीन चांगदेव चव्हाण (वय ४९ रा. मोडनिंब ता. माढा), स्व-ागत लॉज मॅनेजर सिध्दांत सुखदेव गायकवाड (वय ३३ रा. मोडनिंब ता. माढा) यांच्या विरोधात मानवी तस्करी व अनैतिक व्यापाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अटक आरोपीना माढा न्यायालयात हजर केले असता प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. डी. कुलकर्णी यांनी त्यांना १७ मार्च मंगळवारपर्यंत पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. यातील एकूण २५ पीडित महिलांची सुटका केली असून न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व महिलांना सोलापूर येथील सुधारगृहात पाठवण्यात आले आहे.



केंद्रातून मोठ्या प्रमाणात अश्लील साहित्य, मोबाईल, रेकॉर्डिंग डिव्हाइसेस जप्त करण्यात आले आहेत. पिडित तरुणींना बाहेरून आणून येथे कोंडून ठेवण्यात येत होते. त्यांना नृत्याच्या नावाखाली ग्राहकांसोबत अनैतिक कामे करायला भाग पाडले जात होते. कला केंद्र मालक, मॅनेजर व कामगार हे आर्थिक फायद्यासाठी पर जिल्हा व पर राज्यातून महिलांना आणून त्यांच्याकडून बळजबरीने वेश्या व्यवसाय करून घेत होते.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधिक्षक प्रीतम यावलकर, सहाय्यक पोलिस अधीक्षक, अंजना कृष्णा व्ही एस यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलिस अधिकारी तथा परिविक्षाधीन आयपीएस राहुल आत्राम, पोलिस उपनिरीक्षक सुनील सरडे, पोलिस उपनिरीक्षक विलास रणदिवे, हवालदार प्रदीप पर्वते, सहदेव देवकर, चालक नितीन डाकवाले, पोलिस कॉन्स्टेबल प्रसाद अनुभुले व उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयातील हवालदार मंगेश पवार, गणेश गुटाळ, कॉन्स्टेबल भोसले, निकम व प्रभारी अधिकारी टेंभुर्णी यांचे मुख्यालयाकडील चालक व आरटीपीसी, महिला कॉन्स्टेबल धनश्री मांढरे यांनी ही कारवाई केली आहे.

बीड जिल्ह्यातील उपसरपंच गोविंद बर्गे यांच्या आत्महत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी नर्तिका पुजा गायकवाड हिचा पिडीत महिलांमध्ये समावेश असल्याची माहिती समोर आल्याने खळबळ उडाली आहे. पुजा ही धाराशिव जिल्ह्यातील पिं-पळगाव येथील तुळजाई कला केंद्रात होती त्यावेळी बर्गे व हिचे प्रेमसंबंध जुळले त्यानंतर त्यांनी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. 'मालकीण' परंपरा अनं संपत्ती लुट, ब्लॅकमेल व आत्महत्या असे हे चक्र होते. पुजा हिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती, जामिनावर सुटताच ती तिथे गेली.

धाराशिव जिल्ह्यातील चोरा-खळी येथील महाकाली कला केंद्र वगळता सर्व ५ कला केंद्राचे पर-वाने जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, पोलिस अधीक्षक रितु खोखर यांनी कायमस्वरूपी रद्द केले आ-हेत. पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी अवैध धंदे बाबत ठोस भुमिका घेतल्याने हे शक्य झाले असुन शेजारील सोलापूर जिल्ह्यात कला केंद्राच्या नावाखाली रॅकेट उघड झाले आहे. धाराशिव जिल्ह्यातील काही कला केंद्र मधील नर्तिका यापुर्वी सेक्स रॅकेटमध्ये सापडल्या होत्या. काहींनी परवाने रद्द आदेशा विरुद्ध अपील केले असुन त्यावर जिल्हाधिकारी काय निर्णय घेतात याकडे लक्ष लागले आहे.

---

# पडघा बस स्थानकात येणारी कल्याण बस बंद; प्रवाशांचा अर्धा किमी पायी प्रवास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



### विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिकांचे भर उन्हात हाल

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघे येथे येणारी कल्याण बस मागील काही दिवसांपासून मुख्य पडघा बस स्थानकात येत नसून ती फक्त पडघा प्रवेशद्वारापर्यंतच मर्यादित ठेवण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत असून विशेषतः विद्यार्थी, वृद्ध आणि महिला प्रवाशांचे हाल होत आहेत. पूर्वी ही बस थेट पडघा बस स्थानकात येत होती. मात्र अचानक हा बदल झाल्याने प्रवाशांना सुमारे अर्धा किलोमीटर अंतर पायी चालत जावे लागत आहे. उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने भर उन्ह-ात बसची वाट पाहावी लागत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रात्रीच्या वेळी हायवेवर बस पकडताना महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होत असल्याची भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. चोरी व छेडछाडीच्या घटनांची शक्यता नाकारता येत नसल्याने ही परिस्थिती अधिक गंभीर ठरत आहे.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते योगेश जाधव यांनी पडघा ग्रामपंचायत मध्ये पत्रव्यवहार करून ही बस सेवा पुन्हा पडघा बस स्थानकात सुरू करण्याची मागणी केली आहे. तर पडघा येथील सामाजिक कार्यकर्ते शरद साने यांनी यापूर्वी सन २०२४ मध्ये पडघा पोलीस स्टेशन तसेच पडघा ग्रामपंचायत येथे अर्ज दिला होता की, पडघा बस स्थ-ानक येते फोर व्हीलर, टू व्हीलर यांचा अतिक्रमण होत असून तो लवकरात लवकर हटवण्यात यावा. व मूळ रस्त्याची रहद-ारी मोकळी करण्यात यावी. तसेच शारदा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पडघे यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन 'शेरेकरपाडा' येथे अधिकृत बस थांबा देण्याची मागणी केली आहे. परिसरातील बहुतांश विद्यार्थी दुर्गम भागातून प्रवास करत असून ते पूर्णपणे एसटी बस सेवावर अवलंबून आहेत. सध्या पडघा कमान-ीपासून शाळेपर्यंत दीड ते दोन किलोमीटर अंतर विद्यार्थ्यांना पायी चालावे लागत असल्याने ते वेळेवर शाळेत पोहोचू शकत नाहीत. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असून, लवकर निघूनही शारीरिक थकवा जाणवत असल्याने त्यांच्या अभ्यासातील एकाग्रतेवरही परिणाम होत आहे. यासाठी हायवे जवळील 'पडघा कमानी' च्या पुढे असलेल्या 'शेरेकरपाडा' येथे बसला अधिकृत थांबा देण्यात यावा. शेरेकरपाडा येथे बस थांबल्यास, तिथून शाळेचे अंतर कमी होईल आणि विद्यार्थ्यांना कमी कष्टात व कमी वेळेत शाळेत पोहोचता येईल. अशी मागणी शारदा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पडघे यांनी कल्याण बस डेपो मॅनेजर, कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे. या पार्श्वभूमीवर पडघा पोलिस ठाण्यात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. कल्याण बस डेपो व्यवस्थापकांनी लवकरच बस सेवा पुन्हा पडघा बस स्थानकापर्यंत सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. या बैठकीस पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर, सरपंच सायली पाटील, पंचायत अधिकारी भास्कर घुडे, अशोक शेरेकर, शैलेश बिडवी, डॉ. संजय पाटील, दिनेश गंधे, रवी विशे, अभिषेक नागावेकर, मयूर गंधे, अशोक गायकवाड व काळुराम गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, पडघा बस स्थानकात भिवंडी व कल्याण आगाराकडून देखरेख अधिकारी नियुक्त करावेत, अशी भावना स्थानिक नागरिकांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली. एसटी महामंडळाकडून नागरिकांना सकारात्मक प्रतिसाद मिळेल का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

# ग्राहक म्हणून नेहमी जागरुक रहा : तहसीलदार सचिन लंगुटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : ग्राहक हा बाजारपेठेचा राजा आहे. ग्राहकांना वस्तू निवडणे, त्याची गुणवत्ता आणि दर्जा यांचे प्रमाण जाणून घेण्याचा, माहिती मिळविण्याचा अधिकार आहे. अनेकदा वस्तू खरेदी करताना ग्राहक बऱ्याच गोष्टींकडे दुर्लक्ष करतात आणि याचाच गैरफायदा विक्रेते घेतात. त्यामुळे ग्राहकाने नेहमी जागरूक राहावे असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले.

तहसील कार्यालय पंढरपूर येथे १५ मार्च हा जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. यावेळी नायब तह-सीलदार बालाजी पुदलवाड, पुरवठा निरीक्षक विजय बादल, पुरवठा सहा. उमेश हिंगमिरे, नेताजी ओव्हाळ, ग्राहक पंचायतीचे सह सचिव आझाद आल्लापूरकर, मंडळ अधिकारी, नागरिक तसेच कर्मचारी उप-स्थित होते.

यावेळी तहसीलदार श्री. लंगुटे म्हणाले, दरवर्षी १५ मार्च रोजी साजरा होणारा जागतिक ग्राहक हक्क दिन हा दिवस ग्राहकांच्या अधिकारांविषयी जागृती वाढविण्यासाठी महत्त्वा-चा मानला जातो. ग्राहकांना सुरक्षित दर्जेदार आणि पारदर्शक सेवा मिळाव्यात तसेच त्यांच्या तक्रारींना न्याय मिळावा यासाठी शासन विविध उपक्रम राबवत आहे. ग्राहकांना बाजारपेठेत खरेदी करताना अनेकदा चुकीची माहिती निकृष्ट दर्जाचे उत्पादने किंवा फसवणुकीला सामोरे जावे लागते. यासाठी ग्राहकांनी कोणतीही वस्तू घेताना पक्की पावती घेणे आवश्यक आहे. घेतलेल्या वस्तूमध्ये काही कारणास्तव खराबी किंवा त्याच्या सेवेमध्ये त्रुटी आल्यास त्या पावतीचा महत्त्वाचा उपयोग आपल्याला ग्राहक तक्रारीमध्ये करता येतो. आपण घेतलेल्या वस्तूंमध्ये काही त्रुटी आढळल्यास ग्राहक कायद्याअंतर्गत आपण जिल्हा ग्राहक न्यायालयात दाद मागू शकतो तसेच अखिल भारतीय ग्राहक पंचायत यासारख्या विविध संघटनांची मदत घेऊन आपण या तक्रारींची निरसरण करू शकतो असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी ग्राहक पंचायतीचे सह सचिव अल्लापुरकर यांनी ग्राहक कायदा विषयक माहिती सांगून ग्राहक न्यायालयांमध्ये कशाप्रकारे तक्रारी मांडू शकतो आणि सार्वजनिक तक्रारी असतील तर त्या सीसीपीए या ग्राहक समितीकडे आपण कशा पद्धतीने मांडू शकतो याच्याबद्दल मार्गदर्शन केले. तालुक्यातील नागरिकांना काही अडचणी आल्यास अखिल भारतीय ग्राहक पंचायत पंढरपूर तालुका यांच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन करून आपले प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरवठा निरीक्षक विजय बादल यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुरवठा सहाय्यक उमेश हिंगमिरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार पुरवठा सहाय्यक नेताजी ओव्हाळ यांनी केले .

---



# मच्छिंद्र दादा युवा प्रतिष्ठान आयोजित भीम जन्मोत्सव नियोजन बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनिधी सुधाकर रणदिवे : कळंब परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा परिसरात आगामी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वा-तावरणात संपन्न झाली.बैठकीत जयंती उत्सवाचे नियोजन, कार्यक्रमांची रूपरेषा आणि जबाबदाऱ्या यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी उत्सवासाठी कार्यकारिणीची निवड एकमताने करण्यात आली. त्यानुसार अध्यक्षपदी राणा सरवदे, उपाध्यक्षपदी किरण सरवदे, सचिवपदी रुपेश इनकर आणि कोषाध्यक्षपदी प्रज्वल कांबळे यांची निवड करण्यात आली.

उत्सवाच्या नियोजनासाठी मार्गदर्शक म्हणून अजय सरवदे, इम्रान मुल्ला, बंडूभाऊ बनसोडे, राहुल माने, शक्ती गायकवाड, आकाश गायकवाड, हुजेब बागवान, रंजीत भोसले यांची निवड करण्यात आली.

तसेच सदस्य म्हणून सत्यजित कांबळे, संग्राम बनसोडे, यासीर शेख, अंशू कसबे, समीर शेख, पृथ्वीरत्न गाडे ,अनिकेत खर्डे, गणेश खर्डे, रोहित घाटपारडे, विधान गायकवाड, लखन गांजीकर, प्रतीक गायकवाड, प्रेम गायकवाड, राज, अमित गांजीकर, अजित यादव, बबलू सौदागर,राजरत्न गाडे, अभिषेक कांबळे यांची निवड करण्यात आली.

बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव भव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा निर्धार सर्व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. जयंती निमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्याचेही यावेळी ठरविण्यात आले.

बैठकीस परिसरातील अनेक युवक व कार्यकर्ते उपस्थित होते आणि सर्वांनी उत्सव यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आश्वासन दिले.

---

**संविधानामुळे नागरिकांना समानता स्वातंत्र्य न्याय आणि बंधुता ही मूलभूत मुल्ये प्राप्त झाली आहेत**

**डॉ. अनिता मुदकण्णा यांचे प्रतिपादन**

# भारतीय संविधान हे आपल्या देशाचे सर्वोच्च दस्तावेज आहे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग /दादासाहेब बनसोडे : भारतीय संविधान हे आपल्या देशाचा सर्वोच्च बहुमान आहे. लोकशाही पद्धतीने देश चालवण्यासाठी आवश्यक असलेले नियम अधिकार आणि कर्तव्य संविधाना मध्ये दिले आहेत संविधाना मुळे नागरिकांना समानता स्वतंत्र न्याय आणि बंधुता ही मूलभूत मूल्य प्राप्त झाले आहेत आपल्याला मतदानाचा हक्क मिळाला असून प्रत्येक नागरिकांना आपले मत व्यक्त करण्याचे स्वतंत्र अधिकार मिळाले आहेत तसेच विविध धर्म , भाषा, संस्कृती असलेल्या लोकांना एकत्र जोडण्याचे काम ही संविधानाच्या माध्यमातून केलं जातं डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेले भारतीय संविधान जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे मजबूत आधारस्तंभ आहे .

देशातील प्रत्येक महापुरुषांचे विचार डोळ्यासमोर ठेवून आपल्याला त्यांच्या विचाराने मार्गक्रमण करण्याची चांगली संधी मिळाली आहे त्याप्रमाणे आपण सर्वांनी एकत्र येऊन समतेचा विचार देऊन देशातील सर्व बंधू भावांना एकत्र आणण्याची मजबूत जोड संविधाना मुळेच मिळाली आहे असे परखड मत जवाहर महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ अनिता मुदकण्णा यांनी केले .

नळदुर्ग येथे नगरपरिषदेच्या वतीने महिला व बालकल्याण समिती व दीनदयाल अंतोदय राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि १७ मार्च २०२६ रोजी नळदुर्ग शहरामध्ये महिलांचा मान सन्मान व्हावा या उद्देशाने महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अपर्णाताई अरविंद बेडगे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर यांच्या माध्यमातून नळदुर्ग शहरातल्या कर्तव्य बजावत असलेल्या महिलांचा गुणगौरव सोहळा संपन्न करण्यात आला त्यावेळेस त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या

नळदुर्ग शहरातल्या महिला डॉक्टर, महिला कर्मचारी, महिला आरोग्य सेविका, महिला सफाई कामगार, विविध क्षेत्रांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या महिलांचा सन्मान सो-हळा करण्यात आला .

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नळदुर्ग नगरीचे प्रथम नागरिक नगराध्यक्ष बसवराज धरणे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर नगरसेविका सुमनताई ठाकूर ,मीनाक्षीताई काळे नगरसेविका राणी-ताई सुरवसे , नगरसेविका साक्षीताई नळदुर्गकर , नगरसेविका कमलताई गायकवाड , उपजिल्हा रुग्णालयातील





प्रमुख डॉ चंचलाताई बोडके ,डॉ सुरेंद्र मुडके , डॉ कोळेकर .कुरेशी मन्नाबी गफ्फार इनामदार झुलेखा बेगम गटनेते मारुती खारवे , सभापती तानाजी जाधव , सभापती शशीकांत पुदाले , ड अरविंद बेडगे नगरसेवक इमाम शेख नगरसेवक आकाश कुलकर्णी नगरसेवक प्रवीण गायकवाड आदी जण उपस्थित होते .

प्रथमता मा जिजाऊ , सावित्रीमाई फुले , अहिल्यादेवी होळकर , माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्प पूजन करून कार्यक्रमाला सुरुव-ात करण्यात आली यावेळी आलेल्या सर्व पाहुण्यांचा व महिलांचा शाल बुके आणि नगरसेविका साक्षी किशोर नळदुर्गकर यांच्याकडून भारतीय संविधानाचा ग्रंथ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला . नळदुर्ग शहरातील सामाजिक कार्यकर्त्या कल्पनाताई गायकवाड सह अनेक कर्तव्य बजावत असलेल्या महिलांचा प्रमुख्यात म्हणजे महिला सफाई कामगारांचा सन्मान करण्यात आला यावेळी नळदुर्ग शहरातील विविध बचत गटांच्या महिलांना कर्ज वितरित करण्यात आले यावेळी महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त व निवेदक भैरवनाथ कानडे यांचाही शाल फेटा पुष्पगुच्छ आणि भारतीय संविधानाचा ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भैरवनाथ कानडे यांनी केले तर शेवटी आभार महिला व बालकल्याण समितीच्या सभापती अपर्णाताई अरविंद बेडगे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजय काकडे ,समूह संघटिका राणूबाई सकपाळ सुरज गायकवाड , पल्लवी पाटील , दिक्षा सरसट , अंकुश माने , मयूरी जाधव दस्तगिर जागीरदार , प्रथमेश नडगिरे ,व इतर कर्मचारी यांनी केले.